सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १३१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ३ जुलै २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

### राम मंदिरातील देणगी चोरीवर 'आरएसएसची' प्रतिक्रिया

# रामभक्तांच्या भावना दुखावल्या, दोषींना शिक्षा झाली पाहिजे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नागपूर-** अयोध्या येथील राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणी देशभरात चर्चा सुरू आहे. कर्मचाऱ्यांनी लाखो रुपयांची देणगी चोरल्याचे उघड झाले आहे, या प्रकरणी आरएसएसची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. 'देशातील रामभक्तांच्या भावना दुखावल्या आहेत, दोषींना शिक्षा झाली पाहिजे', अशी प्रतिक्रिया आरएसएसने दिली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपले पहिले निवेदन जारी केले आहे. संघटनेचे सरचिटणीस, दत्तात्रेय होसाबळे यांनी म्हटले आहे की, तपासात दोषी आढळलेल्या कोणालाही कठोर शिक्षा झाली पाहिजे. अयोध्या येथील श्री रामलल्ला मंदिरातील दानपेट्यांच्या चोरीच्या दुर्दैवी घटनेने संपूर्ण समाजाच्या आणि रामभक्तांच्या भावना दुखावल्या आहेत आणि या घटनेमुळे आम्ही सर्व व्यथित झालो आहोत.श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या विनंतीवरून, उत्तर प्रदेश सरकारने एक विशेष तपास पथक स्थापन केले असून, त्याच्या शिफारशींच्या आधारे कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. तपासात जो कोणी दोषी आढळेल त्याला कठोर शिक्षा मिळावी हे, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.




होसबळे म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संपूर्ण हिंदू समाजाच्या वतीने, ट्रस्टला स्वाभाविकच आशा आहे की, या निंदनीय घटनेकडे एक अपवाद म्हणून पाहिले जावे आणि व्यवस्थेतील व कार्यप्रणालीतील सर्व त्रुटी दूर करण्यासाठी गांभीर्याने प्रभावी पावले उचलली जावीत, जेणेकरून अयोध्या मंदिरातील लाखो रामभक्तांची श्रद्धा आणि भक्ती अढळ आणि दृढ राहील.

सध्याचा गोंधळ आणि अनिश्चितता संपुष्टात आली पाहिजे. या संदर्भात, आम्हाला आशा आहे की मंदिर व्यवस्थापन आणि प्रशासनाने स्थापन केलेले विशेष तपास पथक सर्व आवश्यक पावले उचलेल.

आम्हाला खात्री आहे की, सुदृढ आर्थिक व्यवस्थापन, निष्पक्ष आणि पारदर्शक प्रणालीसह सुरळीत कामकाज, आणि पवित्रता व गहन धार्मिक भावनेने भरलेल्या वातावरणाच्या माध्यमातून, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट हिंदू समाजाची श्रद्धा आणि विश्वास दृढ करत राहील, असेही त्यांनी म्हटले आहे.

#### आरएसएसने केले आवाहन

आरएसएसचे महासचिव म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ संपूर्ण हिंदू समाजाला आवाहन करतो की, या कठीण काळात आवश्यक संयम आणि धैर्य दाखवावे आणि या दुर्दैवी घटनेचा फायदा घेऊन हिंदू धर्म आणि समाजाला बदनाम करण्याचा प्रयत्न करणाऱ्या हिंदूविरोधी आणि राष्ट्रविरोधी शक्तींचे षडयंत्र हाणून पाडावे.

### २३ विरोधी पक्षांचे CJI सूर्यकांत यांना पत्र

# SIR प्रकरणी हस्तक्षेपाची मागणी; पक्षपाताचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नवी दिल्ली-** विरोधी पक्षांनी डखठ संदर्भात विरोधकांनी पुन्हा एकदा टीका केली आहे. २३ विरोधी पक्षांनी आणि एका अपक्ष खासदाराने भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांना पत्र लिहिले आहे. तसेच यामुळे निवडणूक लोकशाही कमकुवत होत असल्याचा दावा केला आहे. या पत्रात एसआयआर प्रक्रियेतील कथित त्रुटी आणि निवडणुकीशी संबंधित इतर मुद्द्यांवर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी करण्यात आली आहे. विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगावरही पक्षपाताचा आरोप केला आहे.

२८ जून रोजी सरन्यायाधीश सूर्यकांत यांना हे पत्र लिहिले होते.



काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल याबाबत माहिती देताना म्हटले आहे की, २३ विरोधी पक्षांनी आणि एका अपक्ष खासदाराने भारताच्या सरन्यायाधीशांना पत्र लिहून एसआयआर प्रक्रियेतील त्रुटी, भारतीय निवडणूक आयोगाची पक्षपाती भूमिका आणि निवडणुकीशी संबंधित इतर मुद्दे अधोरेखित केले आहेत. लोकशाहीचे रक्षण करणे ही न्यायपालिकेची घटनात्मक जबाबदारी आहे, विशेषतः जेव्हा कार्यकारी मंडळावर संविधानाच्या मूलभूत संरचनेला कमजोर केल्याचा आरोप असतो, असे त्यांनी नमूद केले.विरोधी पक्षांच्या मते देशातील निवडणूक लोकशाही गंभीर संकटात आहे. अनेक घटनात्मक संस्थांनी निष्पक्षता गमावली असून त्या कार्यकारी मंडळाच्या प्रभावाखाली काम करत आहेत. अशा परिस्थितीत, न्यायपालिका हीच लोकशाहीची शेवटची आशा आहे. या पत्रातील मुख्य मुद्दा बिहारमधील एसआयआर प्रक्रिया आहे. पुरेशा आधाराशिवाय एसआयआर प्रक्रिया सुरू करण्यात आली. मतदार याद्यांमधून मोठ्या प्रमाणावर नावे वगळली जाण्याची भीती आहे. ही प्रक्रिया घाईघाईने राबवण्यात आली, असा दावा करण्यात आला आहे.


# उद्धव ठाकरे रामरक्षा, हनुमान चालिसा म्हणणार;

### राम मंदिर दानचोरीवरून रामरक्षा आंदोलनांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मुंबई-** देशात सध्या अयोध्या राम मंदिराचा मुद्दा चांगलाच गाजत आहे. राम मंदिरात मोठी चोरी झाल्याने खळबळ उडाली आहे. यावरून विरोधकांनी भाजपवर निशाणा साधण्यास सुरुवात केली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत निषेध नोंदवला आहे. तसेच येत्या ५ तारखेपासून दादरच्या हनुमान मंदिरासमोर रामरक्षा आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती ठाकरे यांनी दिली आहे. तसेच जे हिंदू आहेत त्या सर्वांनी तिथे यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, आज संपूर्ण देशात जो काही गोंधळ सुरू आहे, जी काही अनास्था निर्माण झाली आहे याचे जे मूळ आहे त्यावर आघात करण्याची वेळ आली आहे. संपूर्ण देश भाजपच्या अमलाखाली आहे. भाजपच्या सत्तेचे जे मूळ आहे, ज्यात आम्ही देखील सहभागी होतो ते म्हणजे राम मंदिर. राम मंदिरासाठी जे आंदोलन झाले होते, त्यात अनेक शिवसैनिक होते. देशातील तमाम हिंदू सहभागी होता. तो काल आजही आपल्याला आठवत असेल. ती सारी दृश्य जनतेच्या मनावर खोलवर रुजलेली आहे.



पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, कारसेवकांवर झालेले अत्याचार, त्यानंतर झालेले गोधरा हत्याकांड, अहमदाबाद मधली दंगल, मुंबईत सुद्धा जे काही घडले होते, त्यात हिंदूंनी बरेच काही सोसले होते. त्या सगळ्याचे भांडवल करून भाजप जो हे आंदोलन सुरू होण्याआधी संपूर्ण देशात त्यांचे फक्त दोनच खासदार होते. गांधीवादी समाजवाद हा त्यांनी अंगीकारलेला एक कार्यक्रम होता, ते सोडून ते राम मंदिर हिंदुत्वाकडे वळले. राम मंदिराच्या मुद्द्याला हात घातला आणि आज देशात अमर्याद सत्ता भोगत आहेत.

'अब हिंदू माफ नाही करेगा'

उद्धव ठाकरे म्हणाले, चोरी तर होत आहेच, राम मंदिरावर दरोडा टाकला जात आहे. त्याबद्दल पुरावे सुद्धा दिले गेले आहेत. तो चोरीचा पैसा इतर पक्ष फोडण्यासाठी केला जात असल्याचेही काही लोक म्हणत आहेत. हे फार दुर्दैव आहे. आणि जसे एकदा अटल बिहारी वाजपेयी म्हणाले होते अब हिंदू मार नही खाएगा तसे आज मी म्हणत आहे अब हिंदू माफ नाही करेगा. जे जे मंदिर लुटत आहेत त्यांना हिंदू त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. याची सुरुवात आम्ही करत आहोत. येत्या रविवारी ५ तारखेला संध्याकाळी चारच्या सुमारास दादरच्या हनुमान मंदिरासमोर तमाम हिंदूंना, ज्यांना ज्यांना असे वाटत आहे की की हिंदू धोक्यात आहे म्हणून ज्यांनी मोर्चे काढले होते त्यांना सुद्धा मी आमंत्रित करत आहे.

# शाळांपासून ५०० मीटर परिसरात विक्रीवर बंदीचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई-** राज्यातील शाळकरी मुलांमध्ये लोकप्रिय होत असलेल्या 'स्टिंग' एनर्जी ड्रिंकवर अखेर राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. पावसाळी अधिवेशनात या विषयावर जोरदार चर्चा झाल्यानंतर शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवर बंदी घालण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिले. या चर्चेदरम्यान अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे विधानभवनात उपस्थित असल्याने या विषयाला अधिक महत्त्व प्राप्त झाले.

बाटलीवरच लहान मुले आणि गर्भवती महिलांसाठी हे पेय योग्य नसल्याचा इशारा दिलेला आहे. त्यामुळे अशा पेयांची विक्री शाळकरी मुलांना होऊ नये. त्यांनी तर दारूपेक्षाही स्टिंग एनर्जी ड्रिंक अधिक घातक आहे, असा दावा सभागृहात केला.

या चर्चेला उत्तर देताना अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी शाळांच्या परिसरात स्टिंगची विक्री होत असल्याचे मान्य केले. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शाळांच्या ५०० मीटर परिसरात ज्या प्रकारे अंमली पदार्थांच्या विक्रीवर निर्बंध आहेत, त्याच धर्तीवर स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवरही बंदी घालण्यात येईल.

### तुकाराम मुंढेंची विधानभवनात एंट्री

#### विधानभवनात तुकाराम मुंढेंची उपस्थिती

स्टिंग एनर्जी ड्रिंकवरील चर्चेदरम्यान अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे विधानभवनात उपस्थित होते. गेल्या काही आठवड्यांपासून अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर त्यांनी सुरू केलेल्या धडक कारवायांमुळे ते चर्चेत आहेत. मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, निकृष्ट अन्नपदार्थ आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल्स, रेस्टॉरंट्सवर सातत्याने कारवाई केली जात आहे.



#### फ्लेव्हर्ड पान, एनर्जी ड्रिंक आणि भेसळीचीही चौकशी

भाजप आमदार राहुल कुल यांनीही सभागृहात आणखी गंभीर मुद्दे उपस्थित केले. त्यांनी शाळांच्या परिसरात एनर्जी ड्रिंक्स, फ्लेवर पानाच्या नावाखाली अंमली पदार्थांची विक्री, तसेच फ्लेवर मिल्कच्या नावाखाली जास्त साखर आणि कृत्रिम पदार्थांचा वापर होत असल्याचा आरोप केला. या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवळ म्हणाले की, तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली या सर्व बाबींची तपासणी सुरू असून दोषींवर कारवाई केली जाईल.

# ५८ तक्रारींवर राष्ट्रीय महिला आयोगाची जनसुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**

राष्ट्रीय महिला आयोगाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात जनसुनावणी घेण्यात आली. यात ५८ तक्रारी विचारात घेण्यात आल्या. विशेष म्हणजे उपस्थित सर्व तक्रारदारांशी आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी व्यक्तिश: भेट दिली आणि त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांना निर्देश दिले.जनसुनावणीच्या वेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, विशेष पोलिस महानिरीक्षक महेश पाटील, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्यासह आयोगाचे अधिकारी उपस्थित होते. जनसुनावणीसाठी आलेल्यांची नोंदणी करून त्यांना टोकन क्रमांक देण्यात आले. नियोजन भवनात दोन पॅनेल करून उपस्थित महिलांच्या तक्रारी ऐकून घेण्यात आल्या. त्यानंतर संवेदनशील प्रकरणी आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती रहाटकर यांनी तक्रारदारांशी व्यक्तीश: संवाद साधला.



जनसुनावणीत प्रामुख्याने पॉश, नातेसंबंधातील तडजोडीची प्रकरणे, घरगुती हिंसाचार आदी प्रकरणे समोर आली. काही प्रकरणी तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेऊन श्रीमती रहाटकर यांनी पोलिसांना तात्काळ गुन्हा नोंदविण्याचे निर्देश दिले. तसेच त्यांची प्रत सादर करण्यास सांगितले. तडजोडीच्या प्रकरणात काहींनी एकत्र राहण्याचे मान्य केले.

जनसुनावणीत आली प्रकरणे ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच या प्रकरणांचा मागोवा घेतला जाणार आहे. यातून पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. गुन्हा नोंदविल्यानंतर चार्जशिट दाखल करण्यापर्यंत प्रकरणांचा पाठपुरावा केला जाणार आहे. आयोगाच्या आखत्यारीत येऊ शकणार नाही, अशा प्रकरणी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यांच्या तक्रारी योग्य प्राधिकरणाकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

महिला आयोगाच्या राज्यातील विविध भागात जनसुनावण्यामुळे महिलांसाठी असलेल्या यंत्रणांबाबत जनजागृती वाढण्यास मदत होत असल्याचे श्रीमती राहटकर यांनी सांगितले.

# महाआरतीसाठी काँग्रेसची 'NOC' घेतली का?

### ठाकरेंच्या रामरक्षा आंदोलनावरून शिंदे गटाचा जोरदार पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मुंबइ-** अयोध्येतील राम मंदिराच्या बांधकामातील कथित अनियमितता आणि दानपेट्यांच्या चोरीच्या मुद्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाच तारखेला राज्यभरात 'रामरक्षा आंदोलन' आणि रविवारी 'महाआरती' करण्याची घोषणा केली आहे. आता हिंदू सत्ताधाऱ्यांना माफ करणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला. त्यांच्या या घोषणेवर आता शिवसेना शिंदे गटाने अत्यंत आक्रमक शब्दांत पलटवार केला असून, उदय सामंत, शंभुराज देसाई आणि संजय शिरसाट यांनी ठाकरेंवर चौफेर टीका केली आहे.

**काँग्रेसच्या मांडीवर बसताना हिंदुत्व कुठे गेले होते? -उदय सामंत**

मंत्री उदय सामंत यांनी उद्धव ठाकरेंच्या हिंदुत्वाच्या भूमिकेवरच थेट प्रश्नचिन्ह निर्माण केले. ज्या वंदनीय बाळासाहेबांनी 'शिवसेना काँग्रेसमय होणार असेल तर मी माझे दुकान बंद करेन' असे सांगितले होते, त्या काँग्रेससोबत तुम्ही जाऊन बसलात, तेव्हा हिंदुत्व कुठे होते? राहुल गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर हिणकस टीका केली, त्यावेळी हिंदुत्व कुठे होते? आता आमचे नेतृत्व आणि खरी शिवसेना लोकांमध्ये लोकप्रिय होत आहे, हे लक्षात आल्यावर त्यांना पुन्हा सावरकर आणि हिंदुत्वाची आठवण झाली आहे, अशी जळजळीत टीका सामंत यांनी केली. तसेच राम मंदिराच्या मुद्द्यावर ते म्हणाले, राम मंदिराचे उद्घाटन झाले, तेव्हा त्यांची भाषा काय होती, हे संपूर्ण देशाने पाहिले आहे. मंदिरातील कथित अनियमिततेबाबत एसआयटी (डखढ) नेमण्यात आली आहे, सरकार कारवाई करेल. पण त्याचा आधार घेऊन पुन्हा 'हिंदूंचे रक्षक' असल्याचा आव आणणे हास्यास्पद आहे. लोकांनी त्यांना नाकारले आहे, म्हणूनच त्यांचे १०० पैकी २० आणि आमचे ८० पैकी ६० आमदार निवडून आले आहेत. मंत्री शंभुराज देसाई यांनी उद्धव ठाकरेंच्या 'महाआरती' करण्याच्या निर्णयावर खोचक टोला लगावला. यूबीटी (णइढ) चे लोक आता महाआरती करणार आहेत. पण ही आरती करण्यासाठी त्यांनी महाविकास आघाडीतील त्यांच्या मित्रपक्षांकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' घेतले आहे की नाही, हे त्यांनी आधी स्पष्ट करावे. मुख्यमंत्री होण्यासाठी त्यांनी हिंदुत्वाची विचारधारा बाजूला ठेवली.असा घणाघात देसाई यांनी केला.



# सत्राच्या प्रारंभीच शैक्षणिक गोंधळ; विद्यार्थी शाळेत, शिक्षक प्रशिक्षणात

### 'अंकतर्क समृद्धी'वरही प्रश्नचिन्ह : पहिल्याच आठवड्यात शिक्षकांवर तिहेरी ताण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** जूनपासून जिल्ह्यात शाळाप्रवेशोत्सवाने नवीन शैक्षणिक सत्राला सुरुवात झाली. शाळा विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सजल्या, नवागत विद्यार्थ्यांनी नव्या स्वप्नांसह वर्गात प्रवेश केला. मात्र, अमरावती जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकच नसल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच आठवड्यात शिक्षकाविना शाळांत विद्यार्थी अशी स्थिती बघायला मिळत आहे.पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळेचे सुरुवातीचे दिवस अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. याच काळात शिक्षक विद्यार्थ्यांशी संवाद साधून, गाणी, गोष्टी, खेळ आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्यात शाळेची गोडी निर्माण करतात. मात्र, यंदा अनेक शाळांमध्ये ही भूमिका पार पाडण्यासाठी शिक्षकच नसल्याने विद्यार्थ्यांचे स्वागत अपुरे पडत असल्याचे चित्र आहे.




एकीकडे शिक्षण विभागाने काहीशिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठविले आहे, तर दुसरीकडे निवडणूक विभागाने विशेष मतदार पुनरीक्षण मोहिमे साठी शिक्षकांना बीएलओची जबाबदारी दिली आहे. परिणामी अनेक शाळांमध्ये एक किंवा दोन शिक्षकांवर संपूर्ण शाळेची जबाबदारी आली आहे. यातच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) यांनी १ ते १५ जुलैदरम्यान इयत्ता १ ते ८ साठी 'अंकतर्क समृद्धी' कार्यक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, शिक्षकच उपलब्ध नसताना हा उपक्रम प्रभावीपणे राबवायचा कसा, असा प्रश्न शिक्षकांना पडला आहे.अनेक शाळांमध्ये तीनपैकी दोन शिक्षक बीएलओच्या कामात असल्याने उर्वरित एकाच शिक्षकावर सर्व वर्गाचा भार येत आहे. काही एक शिक्षकी शाळांतील शिक्षकांनाही सकाळी शाळा घेऊन प्रशिक्षणाला जावे लागत असल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर पहिल्या दिवसापासूनच परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पहिल्या वर्गापासून नाही तर दुसऱ्या वर्गापासून अंकसमृद्धी कार्यक्रम असल्याचे डायटचे प्राचार्यांनी सांगितले.

## संपादकीय ......

# उबाठाची अस्तित्वासाठी निर्णायक कसोटी

महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षांतर हा विषय नवीन राहिलेला नाही. मात्र, एखाद्या पक्षातील सलग होणार्या गळतीमुळे त्या पक्षाच्या नेतृत्वावर, संघटनशक्तीवर आणि भविष्यातील राजकीय अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ लागते. ठाकरे गटाच्या सहा खासदारांनी पक्षाची साथ सोडली आणि विविध जिल्ह्यांतील पदाधिकार्यांच्या सामूहिक राजीनाम्यांच्या घटना घडल्या. याकडे केवळ नेत्यांच्या पक्षांतराच्या दृष्टीने पाहणे चुकीचे ठरेल. हा महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय प्रवाहाचा, नेतृत्वाच्या स्वीकारार्हतेचा आणि संघटनात्मक ताकदीचा गंभीर संकेत आहे.

पूर्वी ठाकरेंची शिवसेना हा केवळ एक राजकीय पक्ष नव्हता, तर तिचा एक वेगळाच दरारा आणि संघटनात्मक धाक होता. पक्षात बंड करणार्या नेत्यांना कार्यकर्त्यांच्या तीव्र विरोधाला सामोरे जावे लागे. यापूर्वी बंड करणार्या नेत्याला तुडवा, हाणा, मारा असे आदेश शिवसेनाप्रमुखांकडून वा नेत्यांकडून देण्याची प्रथा कधी नव्हती. शिवसैनिक बंडखोरांच्या विरोधात रस्त्यावर पेटून उतरत असत. त्यांच्यासाठी शिवसेनेविरुद्धचे बंड हे केवळ पक्षापुरते नसून वैयक्तिक स्तरावर झालेली हानी समजली जात असे. ठाण्यातील एका घटनेनंतर स्वर्गीय आनंद दिघे यांना अटक झाली. दिघे यांच्या अटकेनंतर ठाणे, पालघर आणि नाशिक परिसरात उमटलेली जनभावना किंवा छगन भुजबळ, नारायण राणे यांच्या बंडानंतर निर्माण झालेली राजकीय परिस्थिती यावरून त्या काळातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद दिसून येत होती. बंडखोरी म्हणजे राजकीयदृष्ट्या मोठा धोका मानला जात असे. मात्र, काळाच्या ओघात हे चित्र बदलले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या पश्चात पक्षातील तो धाक आणि कार्यकर्त्यांमधील ती एकजूट पूर्वीइतकी प्रभावी राहिलेली दिसत नाही. सलग होत असलेल्या पक्षांतरांच्या घटनांवरून शिवसेनेसमोरील सर्वात मोठे आव्हान आता संघटना टिकवण्याचे आणि कार्यकर्त्यांचा विश्वास कायम राखण्याचे असल्याचे स्पष्टपणे जाणवते. नेतृत्वाबरोबरच मजबूत संघटनशक्ती हीच कोणत्याही पक्षाची खरी ताकद असते, याची जाणीव या घडामोडींमधून पुन्हा एकदा होते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली २०२२ मध्ये मोठे बंड झाले, त्यानंतर पक्षाचे नाव, चिन्ह आणि संघटनात्मक वैधता यावर संघर्ष झाला. त्या संघर्षानंतरही उद्धव ठाकरे यांनी पक्ष पुन्हा उभा करण्याचा प्रयत्न केला; परंतु सातत्याने होणारी गळती त्यांच्या प्रयत्नांवर प्रश्न निर्माण करत आहे.

राजकारणात पक्षांतर नवीन नाही. अनेक नेते काळानुसार भूमिका बदलतात. सत्तेच्या समीकरणानुसार राजकीय निर्णय घेतले जातात. मात्र, एका पक्षातून निवडून आलेले लोकप्रतिनिधी कार्यकाळ संपण्यापूर्वीच दुसर्या पक्षात जाण्याच्या घटना वाढू लागल्या की लोकशाहीतील नैतिकतेबाबत चर्चा अपरिहार्य ठरते. मतदारांनी एका विचारसरणीवर विश्वास ठेवून दिलेला कौल हा व्यक्तीचा असतो की पक्षाचा, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येतो. सचिन अहिर यांच्या प्रवेशानंतर ठाकरे गटाकडून कायदेशीर कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत. दहाव्या अनुसूचीतील पक्षांतरविरोधी तरतुदींचा उल्लेख करत विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. कायद्याचा अंतिम निर्णय न्यायालयीन प्रक्रियेत होईल; मात्र या वादातून पुन्हा एकदा पक्षांतरविरोधी कायद्याच्या परिणामकारकतेवर चर्चा सुरू झाली आहे. वारंवार होणार्या अशा घटनांमुळे मतदारांच्या विश्वासाला धक्का बसत असल्याची भावना अनेकदा व्यक्त होते. या घडामोडींचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे नेतृत्वाचा स्वीकार. कोणत्याही पक्षाचे अस्तित्व केवळ करिष्माई नेतृत्वावर टिकत नाही. त्यासाठी सक्षम संघटना, कार्यकर्त्यांशी सातत्याने संवाद आणि स्थानिक नेतृत्वाचा सन्मान आवश्यक असतो. काही ठिकाणी वरिष्ठ नेतृत्वाच्या निर्णयांविषयी नाराजी असल्याच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. वरळीसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघातही जुन्या कार्यकर्त्यांच्या भावना दुर्लक्षित झाल्याची चर्चा वारंवार होत आहे. त्यामुळे गळतीची कारणे केवळ सत्तेचे आकर्षण एवढ्यापुरती मर्यादित नसून अंतर्गत असंतोषही त्यामागे असू शकतो.

सचिन अहिर यांच्या प्रकरणानंतर सुनील शिंदे यांनी व्यक्त केलेली नाराजी आणखी महत्त्वाची ठरते. त्यांनी स्पष्टपणे असे सांगितले की, पक्षाच्या वरिष्ठांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे. हा सूर बंडखोरीचा नसला तरी अंतर्गत वेदनेचा नक्कीच आहे. वरळीसारख्या बालेकिल्ल्यात स्थानिक शिवसैनिकांची भूमिका, त्यांचे श्रम आणि बाहेरून आलेल्या नेत्यांना दिलेले अचानक महत्त्व, या सर्वाचा परिणाम काळानुसार गंभीर होत गेला. राजकारणात ‘जिंकणारे चेहरे’ पक्षात आणण्याची पद्धत नवी नाही. पण अशा वेळी मूळ कार्यकर्त्यांचा स्वाभिमान जपला गेला नाही, तर त्याचा फटका उशिरा का होईना, बसतोच. सचिन अहिर यांना पक्षात घेतल्यापासून निर्माण झालेली नाराजी नंतरही पूर्णपणे निवळली नव्हती, असे सुनील शिंदे यांच्या विधानांतून स्पष्ट होत आहे.

शिवसेनेचा इतिहास पाहिला तर पक्षाची खरी ताकद ही शाखा पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने भावनिक नात्यावर आधारित संघटना उभी केली होती. मतभेद असले तरी कार्यकर्त्यांमध्ये नेतृत्वाबद्दल निर्विवाद विश्वास होता. आज परिस्थिती बदलली आहे. समाज बदलला, राजकारण बदलले आणि मतदारांच्याही अपेक्षा बदलल्या. त्यामुळे जुन्या पद्धतीची राजकीय शैली तितकी प्रभावी राहिलेली दिसत नाही. दुसरीकडे, एकनाथ शिंदे यांनी गेल्या काही वर्षांत संघटन विस्तारावर भर दिल्याचे दिसून येते. स्थानिक पातळीवरील नेत्यांना पक्षात सामावून घेणे, सत्तेचा प्रभावी वापर आणि निवडणुकांची सातत्याने तयारी या माध्यमातून त्यांनी स्वत:चे स्वतंत्र राजकीय स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे विविध स्तरांवरील नेत्यांचा त्यांच्या पक्षाकडे ओढा वाढत असल्याचे दिसत आहे.आजचे राजकारण व्यक्तिकेंद्रित होत चालले आहे. विचारसरणी, पक्षनिष्ठा आणि दीर्घकालीन संघटनात्मक बांधिलकी यांची जागा अनेकदा तात्कालिक राजकीय फायद्यांनी घेतल्याचे दिसते. ही प्रवृत्ती केवळ एका पक्षापुरती मर्यादित नाही. जवळपास सर्वच पक्षांमध्ये योग्य संधी मिळाल्यास नेते पक्षांतर करण्यास तयार असल्याची उदाहरणे वाढत आहेत. त्यामुळे मतदारांमध्येही राजकारणाविषयी संशय आणि उदासीनता वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आदित्य ठाकरे यांनी या घडामोडींना वेगळा राजकीय अर्थ देत ‘ऑपरेशन टायगर’ हा उल्लेख केला आणि हे सर्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पंख छाटण्यासाठी घडत असल्याचा दावा केला. हा दावा राजकीयदृष्ट्या लक्षवेधी आहे, कारण तो महायुतीतील अंतर्गत स्पर्धेचा मुद्दा अधोरेखित करतो. म्हणजेच, लढाई फक्त ठाकरे विरुद्ध शिंदे एवढी नाही; तर सत्ता–समीकरणात भाजप आणि शिंदे गटातील भविष्यातील वजन कोणाचे जास्त राहणार याचीही चाचपणी सुरू असल्याचा संकेत या दाव्यातून केल्याचे स्पष्ट होते. तथापि, अशा प्रकारचे दावे करताना ठाकरे गट एका वेगळ्या संकटाला सामोरे गेल्याचे विसरता कामा नये. जेव्हा पक्षातून गळती सुरू असते, तेव्हा बाहेरील कटकारस्थानांवर भर दिल्यास काही काळ राजकीय प्रसिद्धी मिळू शकते; पण दीर्घकाळासाठी आत्मपरीक्षणाचा अभाव यातून अधिक ठळकपणे समोर येतो.

ठाकरे गटासमोर आज दोन मोठी आव्हाने आहेत. पहिले म्हणजे संघटना मजबूत ठेवणे आणि दुसरे म्हणजे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास टिकवणे. केवळ भावनिक आवाहनांवर राजकारण फार काळ चालत नाही. त्यासाठी स्पष्ट राजकीय दिशा, प्रभावी नेतृत्व आणि स्थानिक पातळीवर विश्वासार्ह संघटन उभारावे लागते. दुसरीकडे, शिंदे गटासमोरही आव्हाने कमी नाहीत. वाढता विस्तार टिकवणे, नव्याने आलेल्या नेत्यांमध्ये समन्वय राखणे आणि जनतेचा विश्वास कायम ठेवणे हे त्यांच्या दृष्टीने तितकेच महत्त्वाचे असणार आहे.शिवसेनेचा वारसा मोठा आहे, पण वारसा हा भविष्यासाठी हमीपत्र ठरताना दिसत नाही. तो टिकवण्यासाठी नवीन काळाचे राजकारण समजून घ्यावे लागेल. आज जर नेतृत्वाने आत्मपरीक्षण केले, संघटना पुन्हा भक्कम केली आणि भावनिक भाषणांबरोबर व्यवहार्य राजकीय आराखडा उभा केला, तर पुनरागमन अशक्य नाही. पण जर सगळी चूक फक्त प्रतिस्पर्ध्यांवर ढकलत राहिले, तर गळतीची ही मालिका थांबणार नाही. सचिन अहिर यांच्या पक्षप्रवेशाच्या घटनेकडे केवळ एका व्यक्तीच्या निर्णयाच्या चौकटीत पाहणे योग्य ठरणार नाही. ही घटना नेतृत्व, संघटन, निष्ठा, सत्ता आणि लोकशाहीतील नैतिकतेच्या अनेक प्रश्नांना स्पर्श करते. पक्ष बदलणारे नेते, त्यांच्यामागील राजकीय गणिते आणि मतदारांच्या अपेक्षा यांचा विचार केल्याशिवाय या बदलांचा अर्थ समजणार नाही. शेवटी, कोणताही पक्ष कायम सत्तेत राहत नाही आणि कोणताही पक्ष कायम विरोधातही राहत नाही. लोकशाहीत अंतिम निर्णय मतदार देतात. त्यामुळे पक्षांतराच्या राजकारणापेक्षा जनतेच्या विश्वासाची लढाई अधिक महत्त्वाची ठरेल. आगामी निवडणुकांत मतदार कोणत्या नेतृत्वावर विश्वास दाखवतात, यावरच महाराष्ट्राच्या राजकारणाचा पुढील अध्याय लिहिला जाईल. सध्याच्या घडामोडींनी मात्र एवढे निश्चित केले आहे की, शिवसेनेतील संघर्ष अजून संपलेला नाही; तो आता नव्या स्वरूपात अधिक तीव्र होत आहे.

# एकनाथजी रानडे यांची जयंती शासनस्तरावर

## स्वामी विवेकानंद शिलास्मारकाचे शिल्पकार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती** – गेल्या कित्येक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या मागणीला यश आले आहे. कन्याकुमारी स्थित स्वामी विवेकानंद शिलास्मारकाचे शिल्पकार श्रद्धेय एकनाथजी रानडे यांची जयंती आता शासनस्तरावर साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यातील टिमटाळा हे एकनाथजी यांचे मुळ गाव आहे.अमरावती जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार, संबंधित प्रशासकीय कार्यालये, प्रसिद्धी माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते श्रीपाल सहारे यांनी निवेदनाद्वारे उपरोक्त मागणी लावून धरली होती. त्यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे एकनाथजी रानडे यांची जयंती शासनस्तरावर साजरी करण्याचा मार्ग



मोकळा झाला आहे. अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील टिमटाळा गावच्या मायभूमीत जन्मास आलेल्या एकनाथजींनी देशातील जनतेकडून एक-एक रुपया जमा करून कन्याकुमारी येथील शिल्पावर स्वामी विवेकानंदांचे भव्य दिव्य जगप्रसिद्ध असे वास्तुशिल्प उभारले. सामाजिक कार्यात अग्रेसर राहून देशसेवा करणारे एकनाथजी अमरावती जिल्ह्याचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहे. याच अनुषंगाने त्यांची जयंती शासनस्तरावर साजरी व्हावी यासाठी टिमटाळा येथील रहिवासी श्रीपाल सहारे यांनी जनप्रतिनिधी व प्रशासनदरबारी आपली मागणी रेटून धरली होती.या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळत प्रशासनाने आपली मोहर उमटवली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने जयंती कार्यक्रमांमध्ये वाढ करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मान्यता प्राप्त झाल्यावर परिपत्रक निर्गमित करण्यात येते. त्यानुसार आगामी सन २०२७ च्या शासन परिपत्रकात श्रद्धेय एकनाथजी रानडे यांच्या जयंती कार्यक्रमांमध्ये समावेशाकरीता प्रस्ताव शासन आदेशार्थ सादर करण्यात येत असल्याने टिमटाळापरिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अमरावतीत ‘राज्य माता गोमाता संवाद यात्रा २०२६’

## गोसंवर्धन, गोशाळा सक्षमीकरण व जनजागृतीवर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती** – गुरुवार (दि. २ जुलै) रोजी पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने ’राज्य माता गोमाता संवाद यात्रा २०२६’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शेगाव नाका येथील अभियंता भवन येथे सकाळी १० वाजता हा कार्यक्रम पार पडला.या संवाद यात्रेत राज्यभरातील गोशाळा सक्षमीकरण, गोधारित शेतीचा प्रचार–प्रसार, गोबर व गोमूत्रापासून तयार होणाऱ्या मूल्यवर्धित उत्पादनांना प्रोत्साहन, पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या विविध योजनांची माहिती आणि जनजागृती यावर विशेष भर देण्यात आला.यावेळी गोशाळा संचालकांची आढावा बैठक, पशुसंवर्धन विभाग व गोशाळांमधील समन्वय, पोलिस प्रशासन व गोरक्षक यांच्यातील समन्वय, संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायद्याचा प्रचार–प्रसार तसेच देशी गोवंशाच्या पालन–पोषणा बाबत जनजागृती या विषयांवरही चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन पशुसंवर्धन विभाग, अमरावती आणि गोशाळा महासंघ, अमरावती यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमात गोसंवर्धन क्षेत्राशी संबंधित पदाधिकारी, गोशाळा संचालक, पशुपालक आणि विविध मान्यवर उपस्थित होते.

# पीक विमा हप्ता ११ कोटींचा, भरपाई फक्त २.३० कोटी

## पीक विमा दाव्यांची फेरतपासणी करा आमदार राजेश वानखडे यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** गेल्या खरीप हंगामातील अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करणार्या शेतकर्यांना शासनाकडून काही प्रमाणात मदत मिळाली असली, तरी हक्काचा पीक विमा अद्यापही न मिळाल्याने हजारो शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अमरावती जिल्ह्यासह राज्यातील नाकारलेल्या पीक विमा दाव्यांची स्वतंत्र समितीमार्फत फेरतपासणी करून पात्र शेतकर्यांना तातडीने विमा भरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे यांनी आज विधिमंडळात औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली. आमदार वानखडे यांनी सभागृहात सादर केलेल्या आकडेवारीनुसार, अमरावती जिल्ह्यातील १ लाख ८५ हजार शेतकर्यांनी तब्बल ११ कोटी रुपयांचा पीक विमा प्रीमियम भरला, मात्र त्यापैकी केवळ २ कोटी ३० लाख रुपयांचीच भरपाई मंजूर करण्यात आली. उर्वरित १ लाख ७६ हजारांहून अधिक शेतकर्यांचे दावे तांत्रिक कारणे व नव्या निकषांच्या आधारे फेटाळण्यात आले, ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. गेल्या खरीप हंगामात तिवसा विधानसभा मतदारसंघासह अमरावती जिल्ह्यातील दहा तालुक्यांतील ४२ मंडळांमध्ये अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर, कापूस व इतर पिकांचे मोठे नुकसान झाले. शासनाने नुकसान भरपाई दिली; मात्र पीक विमा योजनेतील चार महत्त्वाचे ट्रिगर निकष रद्द करून केवळ पीक कापणी प्रयोग व सॅटेलाइट तंत्रज्ञानावर आधारित ५० टक्के सरासरी उत्पादकतेचा निकष लावल्यामुळे हजारो शेतकरी विमा भरपाईपासून वंचित राहिल्याचा आरोप त्यांनी केला.



विमा कंपन्यांनी प्रीमियम स्वीकारूनही शेतकर्यांचे दावे नाकारणे ही अन्यायकारक बाब असून, ही समस्या केवळ अमरावतीपुरती मर्यादित नसून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकर्यांना अशाच अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही आमदार वानखडे यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी शासनाकडे अमरावतीसह सर्व प्रभावित जिल्ह्यांतील नाकारलेल्या पीक विमा दाव्यांची स्वतंत्र समितीमार्फत फेरतपासणी, पूर्वीचे चार ट्रिगर निकष पूर्ववत लागू करणे, तसेच विमा कंपन्यांवर दंडात्मक कारवाई करून पात्र शेतकर्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची ठाम मागणी केली.अतिवृष्टीमुळे आधीच आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकर्यांनी मोठ्या अपेक्षेने पीक विमा काढला होता. मात्र, प्रीमियम भरूनही भरपाई न मिळाल्याने त्यांची अवस्था अधिक बिकट झाली आहे. त्यामुळे शासनाने या प्रश्नाकडे संवेदनशीलतेने पाहून तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आगामी हंगामातही शेतकर्यांचा पीक विमा योजनेवरील विश्वास डळमळीत होईल, असे त्यांनी विधिमंडळात सांगितले.

# शासकीय जमिनीवरील पात्र निवासी अतिक्रमणांना पट्टे

## अर्ज प्रक्रिया लवकरच सुरू, अफवांपासून दूर राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती**महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार १ जानेवारी २०११ पर्यंतच्या शासकीय जमिनीवरील पात्र निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करून पट्टे वाटपाची प्रक्रिया राज्यभर राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेत महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांची परिचयात्मक बैठक झाली.बैठकीत शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२६ असल्याची माहिती देण्यात आली. तसेच अर्जाचा नमुना, स्वयंघोषणापत्र (ॲफिडेव्हिट), मानक कार्यपद्धती (डजझ), अर्ज स्वीकारणे, पडताळणी आणि प्रस्ताव सादर



करण्याची प्रक्रिया निश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली.महानगरपालिकेने नागरिकांना कोणत्याही अफवा किंवा गैरसमजांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. अर्जाचे नमुने, आवश्यक कागदपत्रांची यादी, अर्ज स्वीकारण्याची ठिकाणे आणि कालावधी याबाबतची अधिकृत माहिती लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.अधिकृत सूचना जाहीर होण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीकडे आर्थिक व्यवहार करू नयेत किंवा अर्ज सादर करण्याची घाई करू नये, असेही प्रशासनाने बजावले आहे. अधिकृत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध झाल्यानंतरच पुढील प्रक्रिया सुरू करण्यात येईल, असे महानगरपालिकेने स्पष्ट केले.

# अमरावती सायकलिंग असोसिएशन तर्फे

## पंढरपूर सायकलवारी चे दुसर्यांदा आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**

अमरावती सायकलिंग असोसिएशनची संघटना अमरावती मध्ये नेहमीच सायकलिंगचे महत्त्व वाढविण्यासाठी व नागरिकांमध्ये सायकलिंगची आवड निर्माण व्हावी या हेतूने विविध उपक्रम राबवित असते. याच अनुषंगाने ही संघटना वर्षभर विविध सायकलिंग चॅलेंजचे आयोजन राष्ट्रीय स्तरावर करत असते. या स्पर्धांना नेहमीच देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. यावर्षी अमरावती सायकलिंग असोसिएशन तर्फे पंढरपूर सायकल वारी चे दुसर्या वेळेस आयोजन करण्यात येत आहे. पंढरपूर येथे आयोजित पाचवी अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल वारी व सम्मेलन २०२६ मध्ये संपुर्ण महाराष्ट्रातून ४००० ते ५००० सायकल स्वार सहभागी होणार आहेत. अमरावती सायकल असोसिएशनचे ३७ सायकलस्वार व ४ सहकारी सदस्य येथून वारी करिता जात आहेत. या सायकल वारीचा शुभारंभ ०७ जुलै सकाळी ६.०० वाजता एकविरा देवी मंदिरचे प्रांगण येथून होणार आहे. सायकलवारी करिता ५६६ कीमी अंतर पार करायचे असून वारीचा मार्ग मंगळवार दि. ०७ जुलै अमरावतीवरून कारंजा, मंगरुळपीरला पहिल्या दिवसाचा मुक्कामानंतर वाशिम, हिंगोली, ओंढा नागनाथ, जवळा बाजार वरून दुसर्या दिवसाचा मुक्काम त्यानंतर तिसर्या दिवशी परभणी, गंगाखेड, परळी वैज्यनाथ ला मुक्काम. चौथा दिवस दि. १० जुलैला अंबाजोगाइ, कळबं, येरमाळा, बार्शी येथे मुक्काम व पाचवा दिवस कुरूडवाडी, अढीव, व पंढरपूर येथे मुक्काम.रविवार दि. १२ जुलै २०२६ रोजी पंढरपूर येथे आयोजित पाचवी अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल वारी व सम्मेलन २०२६ मध्ये सहभाग नोंदवणार आहे. यावर्षीचे यजमान पद श्रीरामपूर सायकलिंग असोसिएशन यांच्याकडे आहे. पंढरपूर येथे होणारा कार्यकम खालीलप्रमाणे आहे. १२ जुलै, सकाळी ६.०० वाजता सायकलनी नगर प्रदक्षिणा, विठ्ठल रुक्मिणी निवास येथून सुरू होणार, तदनंतर सकाळी ७.०० रेल्वे ग्राऊंड वर सर्व समाविष्ट सायकल वारकर्यांचे अभूतपूर्व सायकल रिंगण सोहळा संपन्न होणार. या वारीत लक्ष्मीकांत खंडागळे सर यांच्या नेतृत्वामध्ये खालील सदस्य सहभागी होणार आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

## विभागातील कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर अपलोड

### एकूण १ लाख ७० हजार ९८४ कर्जखात्यांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** महाराष्ट्र शासनाने ’पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६’च्या प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी साठी सुरुवात केली आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अमरावती विभागातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी पुढाकार घेऊन कर्जमुक्ती योजनेच्या पोर्टलवर माहिती अपलोड करण्याच्या प्रक्रियेत जवळपास शंभर टक्के माहिती अपलोड करुन एक आदर्श ठेवला आहे.

या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विभागातील पाचही जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या असून. या समितीत संबंधित जिल्ह्यांचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आणि व्यापारी बँकांचे जिल्हा समन्वयक यांचा समावेश आहे. तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था हे समितीचे ’सदस्य सचिव’ म्हणून कामपाहणार आहेत.या कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर सूक्ष्म नियोजन व





नियंत्रण केले जाणार असून आधारलिक नसलेल्या कर्जखात्यांचीयादी प्रसिद्ध करून आधार प्रमाणीकरणासाठी विशेष मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानुसार पात्र–अपात्र शेतकऱ्यांच्या याद्यांचे पारदर्शक व्यवस्थापन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तत्पर निवारण करण्यासाठी सर्वविभाग, बँक यांनी समन्वयाने कार्य सुरू केले आहे. विभागातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती अपलोड करण्याच्या कामात मोठी आघाडी घेतली आहे. सहकार विभागाकडून प्राप्त ३० जून २०२६ अखेरच्या अहवालानुसार, विभागातील ९९.९० टक्के पात्र सभासदांची (कर्ज खात्यांची) माहिती पोर्टलवर यशस्वीरित्या अपलोड करण्यात आली आहे. यात अमरावती विभागांतर्गत असलेल्या अमरावती जिल्ह्यातील २७ हजार ९४७, अकोलाववाशिमयादोन्ही जिल्ह्यातील एकूण ६६ हजार ६५, यवतमाळ जिल्ह्यातील ६४ हजार ८६५ तर बुलडाणा जिल्ह्यातील १२ हजार १०७ असे एकूण १ लाख ७० हजार ९८४ कर्जखात्यांचा समावेश आहे.शेतकरी बांधवांना कर्जाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी संबंधित जिल्हा प्रशासनाच्या प्रभावी नियोजनामुळे कर्जमुक्तीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यांत पोहोचली आहे. उर्वरित अल्प कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, यामुळे पात्र शेतकऱ्यांना लवकरच कर्जमुक्तीचा मोठा दिलासा मिळणार आहे. संबंधित जिल्हास्तरीय समितीच्या देखरेखीखाली आणि बँकेच्या गतीमान कार्यामुळे ही योजनाविभागातील शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरणार आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा  आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

## अधिकाऱ्याला धमकी दिल्याप्रकरणी

# नगरसेवक गव्हाळें विरुद्ध गुन्हा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** मनपा वैद्यकीय अधिकाऱ्याला शिवीगाळ व जीवे – मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय देविदासराव जाधव (वय ५१) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी शिवसेनेचे (उबाठा) नगरसेवक संजय गव्हाळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.प्रभाग क्र. २० अंतर्गत येणाऱ्या सुतगिरणी प्रभागातील सामरानगर येथील श्रीकृष्ण मंदिराजवळ मनपाचे वैद्याकीय अधिकारी डॉ. अजय जाधव व अन्य अधिकारी तसेच नगरसेवक नागरिकांच्या समस्या ऐकून प्रभागाची पाहणी करीत होते. नगरसेवक गव्हाळे यांनी अचानक सर्वासमक्ष अधिकाऱ्यांना शहाणपणा करू नको, असे म्हणत शिवीगाळ करीत अंगावर मारायला धावले आणि मारण्याची धमकी दिली. अधिकारी तेथून निघून गेले. डॉ. जाधव यांनी ठाण्यात तक्रार नोंदविली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### सहकार्य करीत नाही, खच्चीकरणाचा प्रयत्न

जनतेच्या कामासाठी, प्रभागातील कामासाठी अधिकाऱ्यांसोबत वारंवार संपर्क करावा लागतो. मात्र अधिकारी फोन उचलत नाही. सहकार्य करीत नाही. त्यामुळे जनतेच्या कामासाठी याबाबत मी विचारणा केली असता हा प्रकार उभा केला.य मी नेहमी लोकांच्या संपर्कात असतो, लोकांचे काम करतो. काही लोकांना माझे वर्चस्व, काम करण्याची पद्धती सहन होत नाही. त्यामुळे माझे खच्चीकरण करण्यासाठी, मला खचविण्याचा हा प्रयत्न आहे. लोकांच्या समस्यांबाबत जाधव यांची मी लेखी तक्रार सुद्धा केली आहे. हे माझे वैयक्तीक काम नव्हते, नगरसेवक म्हणून माझे कर्तव्य बजावले, असे नगरसेवक संजय गव्हाळेयांनी याप्रकरणाबाबत विचारणा केली असता सांगितले.

## जिल्ह्यातील ४९८ ग्रा.पं. ला अंतिम आरक्षणाची प्रतीक्षा

# १० व १३ जुलैला अंतिम यादी प्रसिद्ध होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–**
अमरावती जिल्ह्यात ४९८ ग्रामपंचायतींमध्ये जाहीर केलेल्या आरक्षणात ६९ ग्रामपंचायतींमध्ये ११३ दावेवहरकतीप्राप्त झाल्या होत्या. यापैकी २९ आक्षेपांची दखल घेत आरक्षणात दुरूस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे आता ४९८ ग्रामपंचायतींना अंतिम आरक्षणाची प्रतीक्षा लागली असून १० व १३ जुलैला अंतिम यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये





सार्वत्रिक निवडणुकांचीप्रक्रिया वेगाने सुरू असून ४९८ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडतीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. मागील महिन्यात ग्रामसभा घेऊन प्रारूप आरक्षण यादी प्रसिद्ध करण्यात आली. या प्रारूप यादीवर जिल्हाभरातून ११३ हरकती व सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी २९ ग्रामपंचायतीं-संदर्भातील हरकती ग्राह्य धरून आवश्यक सुधारणाकरण्यात आल्या आहेत. उर्वरित ग्रामपंचायतींचे आरक्षणकायम ठेवण्यात आले आहे. प्राप्त हरकतींवर निर्णय झाल्यानंतर २९ ग्रामपंचायतींची अंतिम आरक्षण यादी १३ जुलै रोजी, तर उर्वरित ४६९ ग्रामपंचायतींची अंतिमआरक्षण यादी १० जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. अंतिम आरक्षण जाहीर झाल्यानंतर मतदार यादी, प्रभागनिहाय तयारी आणि निवडणूक कार्यक्रमाबाबतची प्रक्रिया गती घेणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील इच्छुक उमेदवार, राजकीय पक्ष आणि नागरिकांचे लक्ष आता १० व १३ जुलैलाप्रसिद्ध होणाऱ्या अंतिम आरक्षण यादीकडे लागले आहे. ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गावागावात राजकीय हालचालींनाही वेग आला असून आरक्षणानंतर अनेक इच्छुकांचे राजकीय गणित स्पष्ट होणार आहे.

### १३ जुलै रोजी आरक्षण प्रसिद्धी

अचलपूर तालुक्यातील पथ्रोट, चांदूर बाजार तालुक्यातील पिपरी थुगाव, कारंजा बहिरम, फुबगाव, कुरळपूर्णा, चांदूर रेल्वे तालुक्यातील बोरी, अमरावतीमधील शिराळा, अंजनगाव सुर्जी मधील विहीगाव, अडगाव खाडे, कसबे गव्हाण, धामणगावातील दाभाडा, देवगाव, उसळगव्हाण, बोरवघळ, रायपुर (का), बोरगाव धांदे, सोनेगाव, काशीखेड, जळका पटाचे, निभोरा राज, आजनगाव, वरुडमधील टेंभुरखेडा, पुसला, लोणी, बेनोडा, काचुर्णा, वघाल, सावंगी, इत्तमगाव आदींचा समावेश आहे.

# श्रीकृष्ण मंदिरालगतच्या अनधिकृत अतिक्रमणावर महानगरपालिकेचा कारवाईचा इशारा

### संयुक्त पाहणी करून मोजमाप व सीमांकनाचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** मौजा जेवड येथील सर्व्हे क्रमांक २७/२ मधील श्रीकृष्ण मंदिरालगतच्या जागेवरील अनधिकृत अतिक्रमण हटविण्याच्या दृष्टीने महानगरपालिका प्रशासनाने निर्णायक पाऊल उचलले आहे. यापूर्वी संबंधित अतिक्रमणधारकांना जागा रिकामी करण्याबाबत सूचना व निर्देश देण्यात आले होते. त्यानंतरही अतिक्रमण कायम असल्याने वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसह प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी संयुक्त पाहणी करून पुढील कायदेशीर कारवाईला गती देण्याचे निर्देश दिले.महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या प्रमुख उपस्थितीत महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, गटनेते डॉ. राजेंद्र तायडे, नगरसेविका सुमती ढोके, नगरसेवक संजय गव्हाणे, मंगेश खोंडे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे,



सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, अविनाश रघटाटे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, उपअभियंता हेमंत महाजन, अभियंता श्रीरंग तायडे यांनी संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी केली.संयुक्त पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांनी अतिक्रमित जागेची स्थिती, बांधकामाचे स्वरूप आणि जागेच्या मालकीसंदर्भातील उपलब्ध अभिलेखांची माहिती घेतली. तसेच, संबंधित बांधकामाचे अचूक मोजमाप करून सीमांकन करण्याच्या सूचना महसूल व अभियांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. सीमांकन अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमांनुसार अतिक्रमण हटविण्याची कारवाई तातडीने करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश यावेळी देण्यात आले. महानगरपालिका प्रशासनाने यापूर्वीही संबंधितांना अतिक्रमण स्वखर्चाने हटविण्याची संधी दिली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे महानगरपालिकेला प्रत्यक्ष कारवाईची प्रक्रिया सुरू करावी लागत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सार्वजनिक तसेच शासकीय जागांवरील अनधिकृत अतिक्रमण कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही, असा स्पष्ट संदेश यावेळी महानगरपालिका प्रशासनाने दिला.श्रीकृष्ण मंदिर परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

मंदिरालगत झालेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी महानगरपालिका प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर मंदिर परिसर अतिक्रमणमुक्त करून नागरिकांना सुरक्षित व मोकळी जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.महानगरपालिका प्रशासनाने संबंधित विभागांना सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून कायदेशीर तरतुदीनुसार पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

सीमांकन व मोजमाप पूर्ण झाल्यानंतर अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येणार असून, शहरातील इतर शासकीय व सार्वजनिक जागांवरील अनधिकृत अतिक्रमणांवरही अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्यात येईल, असे महानगरपालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

# बलात्काराच्या गुन्ह्यात अडकलेला आसेगाव ग्राम महसूल अधिकारी सस्पेंड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती,** बलात्कार, मारहाण, धमकी व ब्लॅकमेलिगसह गंभीर आरोपांखाली गुन्हा दाखल झालेले चांदूर बाजार तहसील कार्यालयातील आसेगावचे ग्राम महसूल अधिकारी विपुल भानुदास ठाकरे यांना जिल्हाधिकारी यांनी तत्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश जारी केले आहेत.एकता उर्फ खुशबू रोशन साहू (रा. पार्वती नगर क्र. १, अमरावती) यांनी १९ मे २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीच्या आधारे गाडगेनगर पोलीस ठाण्यात विपुल ठाकरे यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (२) (एन), ३२३, ५०४व५०६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, तक्रारदार महिलेला धमकावणे, मारहाण करणे, जबरदस्ती करणे, ब्लॅकमेलिग करणे तसेच वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या आदेशात नमूद केले आहे की, या प्रकरणाला मोठ्या प्रमाणात प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्धी मिळाल्याने महसूल विभागाची प्रतिमा व शासनावरील जनतेचा विश्वास बाधित होण्याची शक्यता आहे. तसेच संबंधित अधिकारी सेवेत कायम राहिल्यास

### जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

साक्षीदारांवर प्रभाव टाकणे, पुराव्यांमध्ये हस्तक्षेप करणे किवा चौकशीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. मात्र त्यांनी त्यावर कोणतेही स्पष्टीकरण सादर केले नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ४ (१) (क) अन्वये ही कारवाई करण्यात आली असून पुढील आदेशापर्यंत विपुल ठाकरे निलंबित राहणार आहेत. निलंबनाच्या कालावधीत त्यांचेमुख्यालय तहसील कार्यालय, धामणगाव रेल्वे येथे निश्चित करण्यात आले आहे. तहसीलदारांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच निलंबन काळात कोणतीही खाजगी नोकरी किवा व्यवसाय करता येणार नसून, निर्वाह भत्ता घेतानात्याबाबतचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक राहणार आहे.-

# आता तुम्ही कुंभकर्णी झोपेतून जागे व्हा...!

## महापौर श्रीचंद तेजवानी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर संतप्तविभाग प्रमुखांची घेतली आढावा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–**
शहरातील विविध विकासकामे, मूलभूत नागरी सुविधा, प्रलंबित कामे, स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक आरोग्य, बांधकाम, उद्यान, विद्युत व्यवस्था तसेच इतर विभागांच्या कामकाजाचा आढावा महापौर श्रीचंद तेजवानी यांनी गुरुवारी एका बैठकीत घेतला. विभाग प्रमुखांना परस्पर समन्वय वाढवून काम करण्याचे निर्देश महापौरांनी यावेळी दिले. विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत महापौरांनी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर दिला. आता कुंभकर्णी झोपेतून जागे व्हा, जनप्रतिनिधींनी सांगितलेली कामे तत्काळ पूर्ण करा, अशा शब्दात महापौरांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुनावले.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक विभागाने जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करावे, असा सल्ला त्यांनी दिला. महानगरपालिकेच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेतली. अनेक विकासकामे ही एकापेक्षा अधिक विभागांशी संबंधित असतात. त्यामुळे विभागांमध्ये योग्य संवाद आणि नियोजन असल्यास कामांना गती मिळेल, अनावश्यक विलंब टळेल आणि नागरिकांनाही त्याचा थेट लाभहोईल, असे त्यांनी नमूद




केले. महापौरांनी प्रत्येक विभाग प्रमुखाने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रभागांच्या नगरसेवकांशी नियमित संपर्क ठेवावा, त्यांच्या सूचनांना प्राधान्य द्यावे आणि विकासकामे लोकप्रतिनिधींच्या समन्वयाने पूर्ण आणि विकासकामे लोकप्रतिनिधींच्या समन्वयाने पूर्ण करावीत, असे निर्देश दिले. नागरिकांच्या अडचणी सर्वप्रथम नगरसेवकांमार्फत प्रशासनापर्यंत पोहोचतात. त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय राहणे आवश्यक असून, विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारचा संवादाचा अभाव राहू नये, असे त्यांनी सांगितले.

शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करण्याबरोबरच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाई, रस्त्यांची देखभाल, सार्वजनिक आरोग्याशी संबंधित उपाययोजना तसेच नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करण्यासाठी सर्व विभागांनी सतर्क राहावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. प्रत्येक विभागाने आपल्या कामाचे नियोजन निश्चित वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा आणि प्रलंबित कामांचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.बैठकीस उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, गटनेता डॉ. राजेंद्र तायडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, अधिकारी वर्ग उपस्थित होते.-

# जिल्ह्यात केवळ २३.५४ टक्के पेरणी

## दमदार पावसाची प्रतीक्षा, दुबार पेरणीचे सावट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती–**
खरीप पिकांच्या पेरणीची डेडलाइन १५ जुलै असली तरी १ जुलैपर्यंत अमरावती जिल्ह्यात ६ लाख ८२ हजार ९९२ हेक्टरपैकी १ लाख ६० हजार ७६६ हेक्टर म्हणजेच केवळ २३.५४ टक्के विविध पिकांची पेरणी झाली आहे. पुरेशा पावसाअभावी पेरण्या रखडल्या असून, शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. कमी पावसावर पेरणी करणाऱ्यांसोबतच धूळपेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याचे संकट कायम आहे. काही दिवसांपासून जिल्ह्यात पेरणीस पोषक पाऊस पडल्याने खरीप पेरणीला वेग आला आहे. मात्र, अजूनही समाधानकारक पाऊस बरसला नाही. २०२६-२७ च्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाच्या ताज्या अहवालानुसार, प्रस्तावित ६,८२,९९२ हेक्टर क्षेत्रापैकी १,६०,७६६ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे, जे एकूण उद्दिष्टाच्या २३.५४ टक्के आहे. पीकनिहाय आकडेवारी पाहता, जिल्ह्यात कापसाची सर्वाधिक पेरणी झाली आहे. कापसाखालील क्षेत्र ६२,१८९.४ हेक्टरवर पोहोचले आहे. त्याखालोखाल सोयाबीन ५२,९६५ हेक्टर, तूर ३२,२३६.४ हेक्टर, मका



११,४४.२ हेक्टर आणि भात १,५१८.२ हेक्टर क्षेत्रावर आहे. श्रेणीनुसार, तृणधान्य पिकांखालील क्षेत्र १३,१०१.७हेक्टर, कडधान्यांखालील ३२,३९८ हेक्टर, तेल बियांखालील ५३,४९.८ हेक्टर आणि कापसाखालील ६२,१८९.४ हेक्टर होते. यावरून शेतकरी यांनाही नगदी पिकांकडे अधिक कल दिसून येत आहे.


### १००मिमी पाऊस झाल्यावरच पेरणी करा

यंदाचे वर्ष एल-निनोचे असून, पाऊस कमी व अनियमित राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्षभराआधीच व्यक्त केला होता. त्याअनुषंगाने शेतकऱ्यांनी किमान १०० मिलिमीटर पावसाची नोंदहोईपर्यंत् पेरणी करू नये, असे शेतकऱ्यांना वेळोवेळी आवाहन केलेले आहे.-

# सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, अमरावती येथे आईने आपली किडनी देऊन वाचविले मुलाचे प्राण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**
स्थानिक विभागीय संदर्भ सेवारुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे ७३ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.सदर रुग्ण हा काही महिन्यांपासून किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही महिन्यांपासून डायलिसिस करत होता . तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,अमरावती येथे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली. तेव्हा आज रुग्णालयात झालेले ७३ वे किडनी प्रत्यारोपण, हे ३७ वर्षीय





बंटी अरुण धर्माळे यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे.

सदर रुग्ण हा रा. सावरखेड,ता मोर्शी, जि. अमरावती येथील रहिवासी असून मागील काही महिन्यांपासून डायलिसिस चालु होते. मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी मुलाच्या पुढील भविष्याचा विचार करून आई सुरेखा अरुण धर्माळे (५८) यांनी आपली एक किडनी मुलगा बंटी ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी बंटी ला देऊन त्याला नवीन जीवन दिले. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. अविनाश चौधरी , युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. प्रतिक चिरडे ,डॉ विशाल बाहेकर , बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ बालकृष्ण बागवाले , डॉ. दिपाली देशमुख , डॉ शीतल सोळंकी, डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, कल्याणी गाढवे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके व मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, निलिमा मलवार, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, यशोधरा नेवाडे , मयुरी खेरडे, ओम महल्ले ,अनु वडे ,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, कोमल भालेकर, रुपाली गवई , दीक्षा बेलखेडे, अर्चना मढावी , आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे, औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, शुभम वरघडे , पंकज बेलुरकर, आशिष मिश्रा, सुनीता ठाकूर , अविनाश राठोड, तुषार नारायण , गजानन मातकर , रुपेश हरडे, राहुल चव्हाण, दिपटे, भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

# पॉश कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समितीने तक्रार निवारणासह जनजागृतीवर भर द्यावा

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती** मातृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व हा तिहेरी संगम सुरक्षित रहावा, यासाठी पॉश कायद्याची अंमलबजावणी चोख व्हावी, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक कामाचे ठिकाण हे सुरक्षितता, सन्मान आणि समान संधी देणारे असले पाहिजे. त्यादृष्टीने पॉश कायद्यांतर्गत आस्थापनांमध्ये स्थापित तक्रार निवारण समित्यांनी अधिक जागरूक राहून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच याबाबत जनजागृती करण्यावर भर द्यावा, असे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी आज येथे केले.कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण (पॉश ऍक्ट) कायद्याबाबत कार्यशाळा श्रीमती रहाटकर यांच्या उपस्थितीत नियोजन भवनात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.जिल्हाधिकारी आशिष येरेकर, यवतमाळ जिल्हाधिकारी विकास मीना, बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे, विधी सचिव श्री. सहारे, महिला आयोगाचे उपसंचालक रामावतार सिंह, नंदिता प्रधान आदी उपस्थित होते.श्रीमती रहाटकर म्हणाल्या की, महाराष्ट्र हे संवेदनशील राज्य आहे. महिलांसाठी प्रत्येक कामाचे ठिकाण हे सुरक्षितता, सन्मान आणि समान संधी देणारे असले पाहिजे. महिलांना सुरक्षित आणि भेदभावमुक्त कामाचे वातावरण मिळावे यासाठी 'पॉश'कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याचे नियमित ऑडिट होण्याची गरज आहे. राष्ट्रीय महिला आयोगामार्फत महिलांच्या विविध विषयांवर वेगवेगळे संशोधन सातत्याने सुरू असतात. या संशोधनातून स्त्रियांसाठी आवश्यक कायदे, त्यांचे अधिकार यावर निर्णय घेण्यास मदत होते. सरकारी, खासगी, संघटित तसेच असंघटित क्षेत्रातील प्रत्येक स्थळी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण कायद्याच्या तरतुदींची काटेकोर अंमल बजावणी करावी. महिलांसाठी सुरक्षित, सर्वसमावेशक आणि लिंग-संवेदनशील कार्य वातावरण निर्माण करण्यावर भर देण्यात यावा. कायद्याने महिलांना संरक्षण दिले आहे. यासाठी अंतर्गत तक्रार समित्या प्रभावीपणे कार्यरत राहून कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती व्हावी. तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता असावी, असेही निर्देश त्यांनी दिले.निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी प्रास्ताविक केले. विविध आस्थापनांमधील तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष, सदस्य,महिला कार्यशाळेत सहभागी झाल्या होत्या. यावेळी उपस्थितांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले.यादरम्यान श्रीमती रहाटकर यांनी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील 'यशोदा एआय' कार्यक्रमात उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी नवे तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रामध्ये महिलांची जागरूकता आणि सहभाग वाढवण्यास प्रोत्साहन दिले.यावेळी प्रभारी प्राचार्य संगीता इंगोले, कॉलेज कौन्सिलिंगच्या जे. डी. थोटे, डीबीटी समन्वयक डी. डी. खेडकर आदी उपस्थित होते.

# नियमबाह्य शुल्कांचा भुर्दंड

## इंग्रजी माध्यमाच्या शाळांवर प्रश्नचिन्ह

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती :**
इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचे आकर्षण आणि मुलांच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने दाखवत अनेक खासगी शाळांकडून प्रवेश प्रक्रियेदरम्यान पालकांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अधिकृत शुल्काव्यतिरिक्त डोनेशन, विकास निधी, उपक्रम शुल्क, गणवेश, पुस्तके आदी विविध कारणांनी अतिरिक्त रक्कम मागितली जात असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे.प्रवेश नाकारला जाईल किंवा मुलाला प्राधान्य मिळणार नाही, या भीतीमुळे अनेक पालक नाईलाजाने ही रक्कम भरत असल्याचे सांगितले जाते.

काही शाळांमध्ये या अतिरिक्त रकमेची अधिकृत पावती न देता रोख स्वरूपात वसुली केली जात असल्याचाही आरोप आहे.याशिवाय, काही शाळांचे ठराविक पुस्तक व गणवेश विक्रेत्यांशी संगनमत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, पालकांना त्याच दुकानातून साहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याचीही तक्रार आहे. त्यामुळे पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.विशेष म्हणजे, एवढे शुल्क भरूनही अनेक शाळांमध्ये दर्जेदार शैक्षणिक सुविधा, प्रशिक्षित शिक्षक, आधुनिक प्रयोगशाळा किंवा आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील वाढते व्यापारीकरण पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनले आहे.

या प्रकाराची शिक्षण विभागाने गंभीर दखल घेऊन खासगी शाळांच्या शुल्क रचनेची, डोनेशनच्या तक्रारींची आणि नियमबाह्य वसुलीची चौकशी करून दोषी संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे.




### एनसीईआरटीच्या पुस्तकांना 'खो'

अनेक शाळांमध्ये गणवेश, पुस्तके, वह्या आणि बूट फक्त ठराविक दुकानातूनच खरेदी करण्याची सक्ती केली जात असते. यामुळे पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. भंडाऱ्यात ही वस्तूस्थिती हमखास बघायला मिळाली. मात्र पालक बोलायला तयार नाहीत. एनसीईआरटीच्या पुस्तकांना 'खो' दिला जात आहे-

### विकास निधी, इमारत निधी, वार्षिक शुल्क

प्रवेश शुल्क, विकास निधी, इमारत निधी, वार्षिक शुल्क आदी विविध नावांनी पालकांकडून मोठी रक्कम आकारली जात असल्याची तक्रार आहे. शुल्क आकारणीत पारदर्शकतेचा अभाव असून, त्याचा आर्थिक भार थेट पालकांवर पडत आहे. महागाईच्या दिवसात ही झळ सोसणे पालकांना कठीण चालले आहे.

# आलियाबादऐवजी पर्यायी जागेचा विचार करा

### जीएमसीसाठी आ. संजय खोडकेंची मागणी


## केंद्राच्या निर्णयानंतरच पुढील भूमिका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती :**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) उभारण्यासाठी मौजे आलियाबाद येथील प्रस्तावित जागा बदलून शहरातील पर्यायी जागांचा प्राधान्याने विचार करावा, अशी मागणी विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी सभागृहात केली. प्रस्तावित जागा वन विभागाच्या अखत्यारीतील 'आयडेंटिफाईड फॉरेस्ट' क्षेत्रात येत असल्याने कायदेशीर व तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या असून जनहिताचा विचार करून फेरविचार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.खोडके यांनी सभागृहात मांडलेल्या मुद्द्यानुसार, आशियाई विकास बँकेच्या (-उइ) पर्यावरणीय सर्वेक्षणात आलियाबाद येथील जागा 'वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८०'च्या कक्षेत येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या पूर्व मंजुरीशिवाय त्या ठिकाणी कोणतेही वनेत्तर बांधकाम करता येणार नाही. या प्रक्रियेमुळे प्रकल्पाला मोठा विलंब होण्याची शक्यता असून शहरापासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावरील रुग्णालय सर्वसामान्यांसाठी गैरसोयीचे ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.याऐवजी शहराच्या मध्यवर्ती भागातील चार पर्यायी जागांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आल्याचे खोडके यांनी सांगितले. जिल्हा स्त्री रुग्णालय व सुपर स्पेशालिटी रुग्णालय परिसरातील जागा, पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या वेलकम पॉईंट परिसरातील जागा, रहाटगाव येथील जागा तसेच कापूस पणन महासंघ (मोसीकॉल) परिसरातील जागा यापैकी एका जागेची निवड करून वैद्यकीय महाविद्यालय उभारावे, अशी त्यांची मागणी आहे.यावर उत्तर देताना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, आलियाबाद येथील जागेबाबत -उइ च्या सर्वेक्षणात वनविभागाशी संबंधित बाबी समोर आल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारची मंजुरी आवश्यक असून वन मंत्रालयाच्या 'परिवेश' पोर्टलवर आवश्यक प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री यांच्या समितीमार्फतही केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.केंद्र सरकारचा अंतिम निर्णय आल्यानंतरच पुढील भूमिका निश्चित केली जाईल. जर वनविभागाची जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी उपलब्ध झाली नाही, तर आ. संजय खोडके यांनी सुचविलेल्या शहरातील पर्यायी जागांचा विचार करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री हसन मुश्रीफ यांनी सभागृहात दिले.

# न्यायालयाने फटकारल्यावर तुकाराम मुंढेच्या एफडीएची माघार

## थेट कारवाई न करता नोटीस देण्याची तयारी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर-** वर्धा येथील गो दुग्ध उत्पादक सहकारी संस्थेच्या मार्फत संचालित गोरस भंडारवर अन्न व औषधी प्रशासनाने (एफडीए) ३१ मे रोजी अचानक छापा टाकला. या धडक कारवाईत तब्बल २५ लाख ८६ हजार १६८ रुपयांचा असुरक्षित दुग्धजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. यानंतर एफडीएने गोरस भंडारला तातडीने बंद करण्याचे आदेश दिले. या कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले गेले. कुठलेही नोटीस न बजावता थेट कारवाई केल्याबाबत उच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. न्यायालयाने फटकारल्यावर आता एफडीए याप्रकरणी माघार घेतली आहे.

नियमांचे पालन न केल्यामुळे जर एखाद्यावर कारवाई केली जाते तर मग कायदेशीर नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात येऊ नये? असे न्यायालयाने विचारले. रेकॉर्डमध्ये काय आहे हे आम्हाला माहिती आहे, त्यामुळेच आम्ही ७० वर्षांचा रेकॉर्ड सादर करण्यास सांगत आहोत. न्यायालयाला व्यवस्था सुरळीत करण्याची संधी आहे. जर अधिकारी दोषी आढळले तर त्यांनाही नोटीस न बजावता थेट कारवाई करू, अशा शब्दात न्यायालयाने विभागाची कानउघाडणी केली.

न्यायालयाने फटकारल्यावर एफडीएने टाळे ठोकण्याचा आदेश मागे घेण्याची तयारी दर्शवली आहे. एफडीएने कुठलीही पूर्वसूचना न देता थेट गोरस भंडारला कुलूप लावले. आता एफडीए गोरस भंडारला इम्प्रुव्हमेंट नोटीस देणार आहे. यानंतर सुधारणा न झाल्यास पुढील कारवाई केली जाईल. एफडीएद्वारा शुक्रवारी न्यायालयात मौखिकरित्या ही माहिती दिली गेली. दरम्यान, एफडीने २०२० नंतर दरवर्षी गोरस भंडारची पाहणी केली असल्याचे सांगितले. मात्र यात काहीही आढळले नसल्याची कबुली सुनावणीदरम्यान दिली. याचिकेवर पुढील सुनावणी ७ जुलैला होणार आहे.

# निवडणुकीत बदनाम झालेला तोच 'कोरस' पेन पुन्हा चर्चेत ?

## एकाच कंपनीलाच का मिळालं काम?




**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती** राज्यातील आरोग्य विभागाच्या कारभारावर आणि पोलिओ लसीकरण मोहिमेच्या नावाखाली सुरू असलेल्या कोट्यवधींच्या खरेदीवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्थानिक स्तरावर अथवा बाजारातील इतर नामांकित कंपन्यांकडून अत्यंत स्वस्त दरात मार्कर पेन खरेदी करण्याचे पर्याय उपलब्ध असताना, आरोग्य विभागाने केवळ 'कोरस' कंपनीकडून तब्बल ४१.३० रुपये प्रति नग या जादा दराने लाखो पेन खरेदी केले आहेत. विशेषतः गत निवडणुकांच्या काळात याच कोरस कंपनीच्या मार्कर पेनची शाई बोटावरून तत्काळ पुसली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता. त्यावेळी प्रचंड वाद होऊनही, याच कंपनीचे पुन्हा कोट्यवधींचे पेन खरेदी करण्यामागे नेमके कोणाचे हितसंबंध गुंतले आहेत, असा थेट सवाल आता उपस्थित होत आहे.

गेल्या काही निवडणुकांमध्ये मतदारांच्या बोटाला लावण्यासाठी याच कोरस कंपनीच्या मार्कर पेनचा वापर करण्यात आला होता. मात्र, अनेक मतदान केंद्रांवर या पेनची शाई अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याच्या आणि ती लगेच मिटत असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. यावरून राजकीय वर्तुळात आणि प्रशासनात मोठी खळबळ उडाली होती. जो पेन मतदानाच्या पवित्र प्रक्रियेत दर्जाहीन ठरला, तोच पेन लहान मुलांच्या पोलिओ लसीकरणासारख्या अत्यंत संवेदनशील राष्ट्रीय मोहिमेत सक्तीने का घुसविण्यात आला, याचे उत्तर देण्यास आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी टाळाटाळ करीत आहेत.

पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी शासनाकडून निधी प्राप्त होतो. प्रशासनाला आवश्यक असलेले साहित्य दरकरारानुसार खरेदी केले जाते. याच प्रक्रियेनुसार स्थानिक स्तरावर मार्कर पेन खरेदी करण्यात आले.
**- डॉ. प्रवीण पारीसे,** प्रभारी डीएचओ, अमरावती.

# अमरावतीतील 'फ्यूल हेडक्वार्टर' हॉटेलला रहस्यमय आग; २० लाखांच्या नुकसानीची शक्यता

## गुन्हेगारीच्या दृष्टिकोनातून तपास सुरू





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती :**
शहरातील वर्दळीच्या बियाणी चौक परिसरातील 'फ्यूल हेडक्वार्टर' हॉटेलला शुक्रवारी सकाळी भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली असली, तरी आग लागण्यामागील कारणांबाबत संशय व्यक्त केला जात असून पोलिसांनी या प्रकरणाचा गुन्हेगारीच्या दृष्टिकोनातूनही तपास सुरू केला आहे.शुक्रवारी सकाळी सुमारे ११.४० वाजता पोलिस नियंत्रण कक्षाला हॉटेलमध्ये आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन अधीक्षक पंधरे, केंद्रप्रमुख सोनकांबळे आणि पाली प्रमुख मनोज इंगोले यांच्या नेतृत्वाखाली अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. सुमारे ५० मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. प्राथमिक माहितीनुसार, हॉटेल मालकाने सुमारे २० लाख रुपयांच्या आर्थिक नुकसानीचा अंदाज व्यक्त केला आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.दरम्यान, आग शॉर्टसर्किटमुळे लागली की त्यामागे अन्य काही कारण अथवा घातपात आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. तसेच हॉटेलमध्ये अग्निसुरक्षेचे सर्व नियम आणि मानकांचे पालन करण्यात आले होते का, याचीही चौकशी केली जात आहे.या बचावकार्यामध्ये मनोहर राठोड, शेख तोशिफ, कासम खान, नरेंद्र कोकणे, राजू शेंडे, हर्षद दहातोंडे, विशाल भगत, मोहन वानखडे, मोहम्मद ताहिर, राहुल घोडे, प्रशांत गोडे आणि जयकुमार वानखडे यांच्यासह अग्निशमन दलाच्या जवानांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलिस सध्या हॉटेल व्यवस्थापनाची चौकशी करत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणीही सुरू आहे. मानवी निष्काळजीपणा किंवा आपराधिक कारणामुळे आग लागल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# चिखलदऱ्यातील गॅबियन बंधाऱ्यांवर संशय

## आमदार बच्चू कडूंचे प्रशासनाला पत्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती** - तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काही मोजक्याच ग्रामपंचायतींमध्ये २५ ते ३० गॅबियन बंधाऱ्यांची खैरात वाटून शासकीय निधीचा अपहार करण्यासाठी निकृष्ट कामे केल्याचे वृत्त 'लोकमत'ने प्रकाशित करताच राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. या वृत्ताची तत्काळ गंभीर दखल घेत आमदार बच्चू कडू यांनी थेट प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी चिखलदराच्या तहसीलदारांना अधिकृत पत्र पाठवून या सर्व संशयास्पद कामांची 'उलट-टपाली' संपूर्ण कुंडलीच मागवून घेतली आहे.

प्रशासकीय यंत्रणा आणि कंत्राटदारांच्या संगनमताने मजुरांऐवजी केवळ कागदोपत्री हजेरी दाखवून, अत्यंत निकृष्ट दर्जाचे तब्बल २३५ गॅबियन व सिमेंट नाला बांध (सीएनबी) उभारण्यात आले. जिल्हा परिषद लघू पाटबंधारे विभागामध्ये अभियंता कार्यरत नसताना झालेली ही कामे लोकमतने उघडकीस आणली होती. आमदार बच्चू कडू यांनी या सर्व कामांची पारदर्शकता तपासण्यासाठी १२ प्रमुख मुद्द्याची माहिती तत्काळ उपलब्ध करून देण्यात यावे, असे पत्र दिले आहे.

तालुक्यात मंजूर झालेल्या सर्व गॅबियन व सिमेंट नाला बांधांची गावनिहाय सविस्तर यादी, प्रत्येक कामाचे प्रशासकीय आणि तांत्रिक मंजुरीचे मूळ आदेश, कामांचे मूळ अंदाजपत्रक नकाशे आणि तांत्रिक मान्यतेची कागदपत्रे, प्रत्येक कामाची मंजूर रक्कम, प्रत्यक्षात खर्च झालेला निधी आणि निधीचा तपशील, संबंधित कामांचे कंत्राटदारांना दिलेले वर्क ऑर्डर, मजुरांचे मस्टर रोल प्रत्यक्ष उपस्थिती आणि वेतन वाटपाच्या नोंदी, साहित्य खरेदीची मूळ बिले, व्हाउचर्स आणि पुरवठादारांची माहिती, शासकीय मोजमाप पुस्तिकाची प्रमाणित सत्यप्रत, काम पूर्ण झाल्याची प्रमाणपत्रे आणि गुणवत्ता नियंत्रण अहवाल, संबंधित अभियंता, ग्रामपंचायत यंत्रणेची माहिती मागवली आहे.